

# निस्तार हक्क :
# जगण्याचा अधिकार

मोहन हिराबाई हिरालाल

वृक्षमित्र
गडचिरोली / चंद्रपूर

# अनुक्रमणिका


१. निस्तार हक्क : विज्ञान व तंत्रज्ञान विषयक पैलू - - - ५

२. अकरा गावांचा नमुना अभ्यास - - - - - - ११

३. कुणाचे काय चुकले ? पुढे काय करावे ? - - - २१

४. महाराष्ट्र शासनाच्या समितीने सुचविलेली
निस्तारासंबंधीची प्रस्तावित उपाययोजना - - - २६

५. ग्रामवन - - - - - - ३६
(- तसनीम अहमद)

६. निस्तार हक्क : अर्थ आणि स्थिती - - - - - - ३८
(- के. के. नायडू)

परिशिष्ट - १
महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील
निस्तार हक्क विषयक तरतुदी - - - ४१

परिशिष्ट - २
काही प्रश्नांचे स्पष्टीकरण - - - - - - ४७

# निस्तार हक्क : जगण्याचा अधिकार

मोहन हिराबाई हिरालाल

वृक्षमित्र, गडचिरोली / चंद्रपूर

# प्रास्ताविक

गाव परिसरातील जल-जंगल-जमीन इत्यादी पासून जगण्यासाठी आवश्यक वस्तू प्राप्त करण्याचे गावसमाजाचे अधिकार म्हणजेच निस्तार हक्क हे आपल्याला माहिती आहेच. महाराष्ट्र राज्य भूराजस्व संहिता १९६६ च्या कलम १६० ते १६७ द्वारे त्याला कायद्याने मान्यता देण्यात आली असून ती अजून कायम आहे. भारतीय वन नीती १९८८ मध्ये "वनात व वनाजवळ राहणाऱ्या आदिवासी व इतर ग्रामीण गरीबांचे जीवन वनावर अवलंबून आहे. त्यांच्या हक्क व सवलतींना पूर्ण संरक्षण देण्यात येईल. वन उत्पादनाच्या उपयोगात त्यांच्या इंधन, चारा, गौण वनउपज व घरासाठी लागणारे लाकूड इ. जीवनावश्यक गरजांना प्रथम प्राधान्य असेल," असे नमूद करून केंद्र शासनाने निस्तार हक्कांना अधिक बळकट केले आहे.

पूर्वी निस्तार हक्कांची व्यवस्था लावताना एक मोठा दोष राहिला आहे. अनुभवातून मिळालेल्या आधुनिकतम ज्ञानाद्वारे त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. प्रत्येक राजस्व गावाचे निस्तार पत्रक बनवून भूखंडावर निस्तार हक्कांची कागदोपत्री नोंद तर करण्यात आली, पण त्यांचे सुयोग्य नियोजन व व्यवस्थापन कसे करावे याचा विज्ञान व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने विचारही करण्यात आला नाही. निस्ताराचे हक्क असलेली वनजमीनही व्यवस्थापनासाठी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. परिणामी अनेक ठिकाणी लोकांचे वनाशी असलेले आत्मीय संबंध नष्ट होऊन वनांचा वेगाने ऱ्हास झाला.

फक्त निस्तार पत्रकात नोंद आहे म्हणून प्रत्यक्षात निस्ताराचा लाभ मिळत नसतो. निस्तार पाहिजे असेल तर गाव परिसरातील वनांचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याकरिता गावकऱ्यांनीच पुढे यावे लागेल. कारण फक्त

शासन, कायदे व वन विभाग हे काम करू शकणार नाहीत हे आता स्पष्ट झाले आहे. त्या वनावर जगण्यासाठी अवलंबून असलेला गावसमाज व वन विभाग मिळूनच हे करू शकतात. हे लक्षात घेऊन 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' हा शासकीय कार्यक्रम राबवून गावकऱ्यांनी आत्म-विश्वास मिळवावा. पुढे तेच वनक्षेत्र कायद्याने ग्रामवन करून घेऊन निस्तारासाठी कायम हक्काची सोय करून घ्यावी. त्यातूनच वन-आधारित चिरस्थायी विकासाचा, समृद्धीचा मार्गही गावासाठी खुला होऊ शकेल.

१९८८-८९ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात असलेल्या २२ गावांचा 'जंगल आणि लोक' या विषयावर सहभागी पद्धतीने अभ्यास करताना पहिल्यांदा निस्तार हक्कांची ओळख झाली. मेंढा (लेखा) सोबत अधिक खोलात शिरलो. गडचिरोली जिल्हा निस्तार अभ्यास समितीचा सचिव, चंद्रपूर जिल्हा निस्तार अभ्यास गटाचा संस्थापक सदस्य व महाराष्ट्र राज्य शासनाच्या गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याच्या निस्तार धोरणाचा आढावा घेण्याकरिता नेमलेल्या शासकीय समितीचा अशासकीय सदस्य म्हणून काम करताना एक-एक पदर उलगडत गेला. त्या निमित्ताने जे लिखाण होत गेले त्याचे संकलन या पुस्तिकारूपाने आकाराला आले आहे. शासकीय निस्तार समितीने सुचवलेल्या उपाययोजनेचाही या पुस्तिकेत समावेश केला आहे. माहितीकरता महाराष्ट्र भूराजस्व संहिता १९६६ मधील निस्तार हक्कासंबंधीचा भाग व पूरक लिखाण म्हणून निवृत्त ज्येष्ठ प्रशासकीय राजस्व अधिकारी श्री. के. के. नायडू व भारतीय वन-प्रशासन सेवेतील एक अनुभवी वन-अधिकारी श्री. तसनीम अहमद यांचे लेख जोडले आहेत.

गावकरी, गाव-पातळीवरील कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, शासन-प्रशासन व अभ्यासक, सर्वांनाच ही पुस्तिका उपयोगी ठरेल अशी आशा आहे.

**- मोहन हिराबाई हिरालाल**

## - १ -

# निस्तार हक्क :
# विज्ञान व तंत्रज्ञान विषयक पैलू

### निस्तारपत्रक

महाराष्ट्र भू-राजस्व संहिता १९६६ मध्ये कलम १६० ते १६७ द्वारा निस्तार हक्काची कायदेशीर व्यवस्था करण्यात आली आहे. खालील गोष्टींकरता निस्तार पत्रकात तरतूद करावी असे स्पष्ट म्हटले आहे. त्या गोष्टी अशा —

१.१ शेतीसाठी उपयोगी जनावरांना विनामूल्य चराई

१.२ गावातील जनावरांना चराईसाठी परवानगी देताना लागू असलेल्या अटी व शर्ती

१.३ गावातील रहिवासींना त्यांच्या सुयोग्य घरगुती उपयोगाकरता खालीलपैकी कोणत्याही वस्तू विनामूल्य घेण्याचा अधिकार.

१.३.१ लाकूड, टिंबर, जळण किंवा इतर कोणतेही वन-उत्पादन

१.३.२ मुरूम, कंकर, वाळू, माती, दगड किंवा इतर कोणतेही लघु-खनिज

१.४ वर क्र. १.३ मध्ये नमूद वस्तू प्राप्त करण्याकरिता अटी व शर्ती

१.५ गावातील कारागीरांना वर क्र. १.३.१ व १.३.२ मध्ये नमूद केलेल्यापैकी ज्या वस्तू त्यांच्या कारागिरीसाठी आवश्यक आहेत त्या प्राप्त करून घेण्यासाठी त्यांना द्यावयाची सवलत

## व्यवस्थापनाची योजना काय व कशी ?

निस्तार पत्रकासोबतच गावातील सर्व अव्याप्त भूमीचे निस्तार पत्रकामध्ये केलेल्या तरतुदींच्या दृष्टीने सुयोग्य व्यवस्थापन व्हावे याकरता योजना तयार करण्यात यावी असे कलम १६१ मध्ये स्पष्ट म्हटले आहे. फक्त निस्तार पत्रक तयार करून काम भागणार नाही. तर त्याकरता व्यवस्थापनाची योजनाही तयार करावी लागेल याची जाणीव कायदा करणाऱ्यांना होती हे यावरून स्पष्ट होते. निस्तार हक्काच्या व्यवस्थापनाकरता सुयोग्य योजना काय व कशी ? या प्रश्नाचे समुचित उत्तर शोधायचे असेल तर निस्तार हक्काच्या विज्ञान व तंत्रज्ञान विषयक पैलूचा विचार करणे आवश्यक आहे.

निस्तार हक्काची कायद्यात तरतूद असूनही प्रत्यक्षात मात्र ते लोकांना सातत्याने मिळू शकत नाहीत. कारण ही कायद्याची व्यवस्था लावताना त्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान विषयक बाजूकडे दुर्लक्ष झालेले आहे. हे हक्क लोकांना सतत मिळत रहावेत अशी अपेक्षा असेल तर ते फक्त कायद्याने जमीन निस्तारासाठी आरक्षित करून होणार नाही. त्या जमिनीवरील जैवभाराचे (बायोमासचे) सुयोग्य व्यवस्थापन कसे व कोण करेल तेही ठरविणे आवश्यक आहे.

## सदोष निस्तार चौकशी

१९५० ते ५५ दरमान्य झालेली निस्तार चौकशी खूपच सदोष आहे. या चौकशीच्या वेळेला मानवशास्त्रीय, तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विषयक पैलूंचा विचार करण्यात आला नाही. माणसांच्या व जनावरांच्या गरजा नेमक्या काय व किती आहेत ? भविष्यात त्यांत काही वाढ होण्याची शक्यता आहे काय ? त्या सतत पूर्ण होत रहावयाच्या असतील तर कोणकोणत्या प्रकारच्या वनस्पती, पशु- पक्षी व कीटकांची किती प्रमाणात आवश्यकता आहे ? त्यासाठी किती जमीन लागेल ? उपयोगाची पद्धत काय

असेल ? इत्यादी प्रश्नांचा शास्त्रशुद्ध विचार न करता निस्तार हक्काची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न अपयशी ठरला आहे.

निस्तार हक्क हे प्रत्येक गावाचे हक्क आहेत. म्हणून निस्तार चौकशी सुद्धा प्रत्येक गावात जाऊन गावकऱ्यांसोबत बसून झाली पाहिजे, हे तत्त्वतः शासनाने मान्य केले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही. दुर्गम क्षेत्र, पिण्याचे पाणी व निवाऱ्यासाठी योग्य जागांचा अभाव इत्यादी कारणांनी चौकशी करणाऱ्यांना प्रत्येक गावात जाऊन चौकशी करणे शक्य झाले नाही, सरासरी १४ गावांसाठी एका जागी चौकशी करण्यात आली, असे गडचिरोली तालुका निस्तार चौकशी रिपोर्ट मध्ये नमूद आहे. सरासरी १४ म्हणजेच अतिदुर्गम आदिवासी भागात तर त्यापेक्षाही जास्त गावांसाठी कुठेतरी बसून चौकशी झाली असणार. त्यामुळे हे चौकशीचे काम खूपच सदोष राहिले आहे.

## अशास्त्रीय निकष वापरून वन-बंदोबस्त

जमीनदारी नष्ट झाल्यावर १९५०-५१ साली जमीनदारांकडील सर्व वनजमीन संरक्षित वन या वर्गवारीत जमा करण्यात आली. निस्तार चौकशीद्वारे निस्तार पत्रक तयार करून या वन-जमिनीवर निस्तार हक्क सुनिश्चित करण्यात आले. पुढे शासनाने संरक्षित वनाचे आरक्षित वनात रूपांतर करण्याकरता भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत कार्यवाही सुरू केली. त्यासाठी १९६३ मध्ये वन-बंदोबस्त अधिकारी नेमून काम सुरू झाले. या अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावाकरता वेगवेगळे आदेश देण्याचे काम १९७३ मध्ये पूर्ण केले. यासाठी लोकांची व जनावरांची प्रत्येक गावाची निस्तार-विषयक गरज काय हे ठरविण्यासाठी वन-बंदोबस्त अधिकाऱ्यांनी दोन निकष वापरले. ते खालीलप्रमाणे –

४.१ जनावरांना चराईसाठी किती जमीन आवश्यक आहे याकरता महाराष्ट्र शासन, राजस्व व वन विभाग, शासकीय निर्णय क्र. एल एन डी.-१०७०-११३०९-अे, दि. १३-४-१९७० चा संदर्भ

देऊन असे म्हटले आहे की "१०० जनावरांच्या चराईसाठी ७६ एकर जमीन पुरेशी आहे." म्हणजेच एका जनावरासाठी सुमारे पाऊण एकर जमीन निस्तारासाठी ठेवली म्हणजे त्याच्या चराई निस्ताराची गरज भागेल असे गृहीत धरण्यात आले आहे.

४.२ लोकांच्या निस्तारासाठी किती जमीन आवश्यक आहे यासाठी महाराष्ट्र शासन, राजस्व व वन विभाग पत्र क्र. बीएफएस/२०६३/१८४१८, दि. २०-५-६९ चा संदर्भ देऊन म्हटले आहे की, "गावाने व्याप्त क्षेत्राच्या, म्हणजेच गावाच्या एकूण शेतीने व्याप्त क्षेत्राच्या, अर्धी जमीन जर लोकांच्या निस्तारासाठी राखून ठेवली तर ती पुरेशी आहे."

गडचिरोली तालुका निस्तार चौकशीचा रिपोर्ट शासनाने १९५६ साली प्रकाशित केला. त्यात म्हटले आहे की वैनगंगा नदीच्या जवळील पूर्व खालसा भागामध्ये एका जनावराला एक एकर व आदिवासी, जंगल, पूर्व जमीनदारी भागात दोन ते चार एकर प्रती जनावर जमीन चराईसाठी आवश्यक आहे असे मानून निस्तार पत्रके तयार करण्यात आली होती. कुठे प्रती जनावर २ ते ४ एकर आणि कुठे सुमारे पाऊण एकर - निकषांमधील हा फरक कोणत्या वैज्ञानिक अभ्यासाआधारे करण्यात आला हे समजू शकले नाही.

माणसांना किती निस्तार आवश्यक आहे हे ठरविताना तर कमालच करण्यात आली. जनावरांच्या निस्ताराचा विस्तार करताना किमान प्रती जनावर किती आवश्यकता आहे याचा विचार करण्यात आला, पण माणसांच्या बाबतीत तो करणे आवश्यक मानण्यात आले नाही. प्रत्येक गावाचे शेतीने व्याप्त क्षेत्र जनसंख्येच्या प्रमाणात सारखेच नसते. असे असतानाही व्याप्त क्षेत्राच्या अर्धे क्षेत्र, असा निकष कुठल्या वैज्ञानिक सूत्राच्या आधारे ठरविण्यात आला याचा प्राप्त माहितीच्या आधारे खुलासा होत नाही.

•

जनावर किंवा लोक यांच्या निस्तार आवश्यकतेचे निकष ठरविताना भविष्यात वाढणाऱ्या त्यांच्या संख्येचाही विचार करणे आवश्यक मानण्यात आले नाही. शिवाय या निस्ताराच्या जमिनी व जंगलांचे चिरस्थायी उपयोगाच्या दृष्टीने कसे व्यवस्थापन करावे हे ठरविण्याचीही गरज वाटली नाही. यावरून हे स्पष्ट दिसून येते की संपूर्ण वन-बंदोबस्ताची कार्यवाही चुकीचे निकष वापरून करण्यात आलेली असल्याने त्यावर आधारित व्यवस्था चिरस्थायी राहू शकणार नाही.

## शास्त्रशुद्ध निकष व व्यवस्थापन अभ्यास

सर्व लोकांना, कारागीरांना व पशुपक्ष्यांना - फक्त आजच नव्हे तर उद्याही - सतत निस्तार मिळत रहावा यासाठी काय उपाय करावे लागतील ? व्यवस्था, रचना व रीत काय असेल ? हा अभ्यास कोणत्याही बंदिस्त प्रयोगशाळेत शक्य नाही. प्रत्येक जीवन जगत असलेल्या लोकांसोबत मिळून सहभागी पद्धतीने हा अभ्यास कसा करायचा याचाही शोध घ्यावा लागेल. अशा अभ्यासासाठी तयार असलेला समाज जिथे आहे अशा गावापासूनच व त्यासोबत अभ्यास करण्याची तयारी असलेले अभ्यासगट किंवा संस्था जिथे आहेत तिथूनच हा अभ्यास सुरू होऊ शकेल.

अशा अभ्यासासाठी गावांना, अव्याप्त जमीन-उपलब्धतेनुसार तीन प्रकारांमध्ये वर्गीकृत करावे लागेल. ज्या गाव परिसरात -

(अ) अव्याप्त क्षेत्र लोकसंख्येच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

(ब) अव्याप्त क्षेत्र लोकसंख्येच्या तुलनेत जेमतेम आहे.

(क) अव्याप्त क्षेत्र लोकसंख्येच्या तुलनेत कमी आहे.

- या तीनही प्रकारची प्रातिनिधिक गावे अभ्यासासाठी निवडल्या जातील याकडे लक्ष द्यावे लागेल.

लोक निस्तारासाठी काय व किती वापरतात याची खरी माहिती

प्रश्नपत्रिका भरून कधीही मिळू शकणार नाही. लोक दैनंदिन जीवनात ज्या वस्तू वापरतात त्यांचे मोजमाप अंदाजाने कधीही बरोबर सांगू शकत नाहीत. वर्षभर प्रत्यक्ष मोजमाप करून नोंदी ठेवणे हाच खरी माहिती मिळविण्याचा योग्य मार्ग आहे.

पर्यावरण-संतुलन व चिरस्थायी विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचे सुयोग्य व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. असे व्यवस्थापन लोक-सहभागाशिवाय शक्य नाही. म्हणून निस्ताराकरिता आरक्षित जमिनीचे व्यवस्थापन लोकसहभागाने कसे करता येईल याचेही प्रयोग करावे लागतील.

अशा प्रयोगांकरता भारतीय वन अधिनियम १९२७ मधील 'ग्रामवन' ची तरतूद उपयुक्त आहे. 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन', 'ग्राम-परिसर विकास कार्यक्रम' व 'सर्वंकष एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम' इत्यादी शासकीय कार्यक्रमांचाही उपयोग होऊ शकेल.

'व्यवस्थापनशास्त्र' (मॅनेजमेंट सायंस) या विषयातही मानवाने बराच मोठा पल्ला गाठला आहे. वन हे अतिशय गुंतागुंतीचे सजीव-एकक (बायो-युनिट) आहे. त्याचे सुयोग्य व्यवस्थापन कुणा एकाने किंवा काही जणांनी करणे शक्य नाही. काही झाडांवर वेगळ्या परिस्थितीत प्रयोग करून काढलेल्या निष्कर्षाआधारे अनेक वर्षांची कार्ययोजना बनवून काम करण्याची पद्धतही बदलावी लागेल, असे शास्त्रीय अभ्यास सांगत आहेत. नैसर्गिक संसाधनांवर जगण्यासाठी अवलंबून असलेला व सतत त्यांच्या संपर्कात राहणारा मानवी समाजच सहभागी पद्धतीने त्यांचे चांगले व्यवस्थापन करू शकेल असे संकेतही अत्याधुनिक वैज्ञानिक संशोधनाद्वारे मिळत आहेत. सूक्ष्म बदलही टिपण्यात सक्षम व त्याआधारे लगेच आवश्यक निर्णय घेण्याची क्षमता असलेली व्यवस्थाच सर्वोत्कृष्ट मानल्या जात आहे. इंग्रजीत यालाच 'ॲडाप्टिव्ह मॅनेजमेंट सिस्टिम' असे म्हणतात. व्यवस्थापनाची हीच अत्याधुनिक शास्त्रीय पद्धत निस्तार व्यवस्थेकरताही स्वीकारावी लागेल.

## – २ –

# अकरा गावांचा नमुना अभ्यास

१९५५ मध्ये झालेल्या निस्तार चौकशीनंतर १९९२ मध्ये वन-बंदोबस्त करण्यात आला. चुकीचे निकष वापरून झालेल्या या वन-बंदोबस्तामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील वन-जमिनीवर असलेले गावांचे निस्तार हक्क मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आले. निस्तार धोरणाचा आढावा घेताना, १९९२ साली घडलेल्या या घटनेचे दूरगामी परिणाम काय झाले व पुढे होतील याचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे. तो घेण्याकरताच शासकीय कागदपत्रातील गाववार माहिती शासन-नियुक्त निस्तार समिती तर्फे मागविण्यात आली होती. परंतु अतिशय खेदाची गोष्ट आहे की ही माहिती समितीला प्राप्त होऊ शकली नाही.

## धक्कादायक चित्र

जी माहिती शासनाने नियुक्त केलेल्या समितीलाही मिळू शकली नाही, ती मिळविण्यास एका अशासकीय सदस्याला किती अडचणी आल्या असतील याची कल्पनाच केलेली बरी. आम्ही गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यामधील अकरा गावांची माहिती मिळवली. या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर समोर आलेले चित्र अतिशय धक्कादायक व पुढे येणाऱ्या संकटाची सूचना देणारे आहे.

## अभ्यासाचे स्वरूप

१९५५ मध्ये जालेल्या निस्तार चौकशीच्या अहवालाप्रमाणे आताच्या गडचिरोली जिल्ह्यातील ३७९ गावांत, ती अनसर्व्हेड (सर्वेक्षण न झालेली) असल्याने, निस्तार चौकशी झाली नव्हती. त्यामुळे या गावांची निस्तार पत्रकेही तयार करण्यात आली नव्हती. ज्या गावांची चौकशी होऊन निस्तार पत्रके तयार करण्यात आलीत, त्यांची वर्गवारी तीन गटांत करण्यात आली -

१) सरप्लस (निस्तारासाठी आवश्यकतेपेक्षा जास्त वन-क्षेत्र असलेली) २) सेल्फ-सफिशिएंट (निस्तारासाठी आवश्यकतेपुरते वन-क्षेत्र असलेली) व ३) डेफिसिट (निस्तारासाठी पुरेसे वनक्षेत्र नसलेली). गडचिरोली जिल्ह्यातील गावांची वर्गवारीप्रमाणे गटवार संख्या खालीलप्रमाणे आहे -

| १९५५ | सरप्लस | सेल्फ-सफिशिएंट | डेफिसिट |
|---|---|---|---|
| (अ) जळतण व टिम्बरच्या दृष्टीने | १०८६ (७८.२९%) | ३७ (२.६६%) | २६४ (१९.०३%) |
| (ब) चराईच्या दृष्टीने | १०३६ (७४.६९%) | २८ (२.०१%) | ३२३ (२३.२८%) |

अभ्यास नमुना जास्तीत जास्त प्रातिनिधिक रहावा म्हणून आम्ही प्रयत्न केला. निवडलेल्या ११ गावांमध्ये हे प्रमाण खालीलप्रमाणे आहे -

| अभ्यास नमुना गावे | सरप्लस | सेल्फ-सफिशिएंट | डेफिसिट |
|---|---|---|---|
| (अ) जळतणाच्या दृष्टीने | ७ (६३.६३%) | १ (९.१%) | ३ (२७.२७%) |

## अभ्यासाची मर्यादा

हा अभ्यास खरे तर निस्ताराशी संबंधित सर्व बाबींकरिता होणे आवश्यक होते. उदा. चराई, जळतण, घर व शेती-औजारे यांच्याकरता लागणारे स्मॉल टिम्बर, अन्न, पाणी व कारागीरांसाठी लागणारा कच्चा माल इत्यादी सर्व बाबी विचारात घेऊन असा अभ्यास करायला हवा. परंतु वन-अधिकाऱ्यांच्या उपसमितीकडून फक्त जळतणासंबंधीचेच गरज व


उत्पादकता हे आकडे उपलब्ध झाल्याने त्या मर्यादितच हा अभ्यास करण्यात आला.

अभ्यासात वापरण्यात आलेले आकडे व त्यांचे स्रोत –

| <u>तपशील</u> | <u>स्रोत</u> |
|---|---|
| प्रती व्यक्ती/वर्ष जळतणाची गरज - ०.२७ मे.टन | अहवाल, निस्तार उपसमितीचा |
| प्रती हेक्टर/वर्ष जळतणाची वनातून उत्पादकता - ०.२ मे.टन | |
| निस्तार हक्क असलेले वनक्षेत्र-१९५५ | गावाचे निस्तार पत्रक (रेव्हेन्यू रेकॉर्ड) |
| निस्तार हक्क कमी केलेले वनक्षेत्र-१९९२ | महाराष्ट्र शासन, राजपत्र दि. मार्च ११, १९९३ भाग चार-अ |
| निस्तार हक्क असलेले वनक्षेत्र-१९९२ | (३) - (४) |
| लोकसंख्या १९५५ व १९९२ | जनगणना अहवाल १९५१ व १९९१ आधारे अंदाज |

## अभ्यासाचे दोन टप्पे

अभासाच्या पहिल्या टप्प्यात आम्ही १९९२ साली झालेल्या वन-बंदोबस्तामुळे निस्तार हक्क असलेल्या वनांच्या स्थितीत काय फरक पडला हे बघण्याचा प्रयत्न केला, व दुसऱ्या टप्प्यात त्या बदलाचा १९९२ मधील जळतणाच्या गरजेच्या संदर्भात विचार करून काय चित्र दिसते व त्यामुळे त्या गावांच्या वर्गवारील काही बदल झाला काय हे बघण्याचा प्रयत्न केला. त्यातून जी माहिती समोर आली ती पुढीलप्रमाणे -


आकृती १
२०००
१५००
१०००
५००
०
मेंढा (लेखा)
जापी
काकडयेली
हिरंगे
येरंडी
मरकेगाव
परसवाडी
राजोली
लेखा
पांडसडा

## अभ्यासाचे निकष

**१. निस्तार हक्कासह वनक्षेत्र - १९५५ व १९९२**

**(कृपया आकृती-१ पहा)**

१) खरकाडी गावाचे वनक्षेत्र कमीही झाले नाही व वाढलेही नाही.

२) उरलेल्या नऊ गावांतील निस्तार हक्क १९५५ च्या तुलनेत १९९२ मध्ये वन-बंदोबस्त करून ज्या प्रमाणात कमी करण्यात आले त्यांची गाववार माहिती अशी -

पांढसडा (६२.५९ टक्के), लेखा (५७.८८ टक्के), राजोली (६६.८७ टक्के), परसवाडी (८३.२५ टक्के), मरकेगाव (७५.६८ टक्के), येरंडी (८५.०२ टक्के), हिरंगे (९१.६७ टक्के), काकडयेली (३६.३३ टक्के), जापी (७६.१४ टक्के), मेंढा (लेखा) (९१.६२ टक्के). गावाच्या नावापुढे कंसात लिहिलेले आकडे निस्तार हक्क नष्ट केलेल्या वनक्षेत्राचे आहेत.


**२. वन-उपलब्धता, जळतणासाठी आवश्यकता व १९९२ साली निस्तारासाठी ठेवलेले वनक्षेत्र**

**(कृपया आकृती-२ पहा)**

१) १९५५ साली काकडयेली सरप्लस होते, ते १९९२ मध्ये सेल्फ-सफिशिएंट मध्ये रूपांतरित झाले.

२) मेंढा (लेखा), जापी, हिरंगे, येरंडी, मरकेगाव, परसवाडी सरप्लस होते, ते १९९२ मध्ये डेफिसिट झाले. पुरेसे वन-क्षेत्र उपलब्ध नाही म्हणून असे झालेले नाही. निस्तारविषयक चुकीचे निकष वापरून केलेल्या वन-बंदोबस्तामुळेच हे झालेले आहे.

३) पांढसडा १९५५ साली सेल्फ-सफिशिएंट होते, ते १९९२ मध्ये डेफिसिट झाले आहे. या गाव-हद्दीत संपूर्ण गरज पूर्ण करेल इतके वन-क्षेत्र नसले तरी सुमारे ८० हेक्टर वनक्षेत्र अजूनही उपलब्ध आहे, ज्यावर निस्तार हक्क दिल्यास निस्ताराचा तुटवडा थोडातरी कमी करता येणे शक्य आहे.


जंगल उपलब्ध
निस्तार गरज
निस्तार क्षेत्र
मेंढा (लेखा)
काकडयेली
हिरंगे
येंडी
मरकेगाव
परसवाडी
राजोली
लेखा
पांढसडा
खरकाडी
0
200
400
600
800
1000
1200
1400
1600
1800
2000

आकृती २

४) राजोली, लेखा आणि खरकाडी ही गावे १९५५ मध्येही डेफिसिट होती. १९९२ मध्ये ही गावे सुपर-डेफिसिट झाली आहेत. सुयोग्य निस्तार व्यवस्थेअभावी ही गावे त्यांना लागून असलेल्या शासकीय वनातूनच आपली गरज बेकायदेशीररित्या पूर्ण करीत असणार. अर्थातच त्याचा विपरीत परिणाम तेथील वनव्यवस्थापनावर होणारच.

**३. १९९२ साली झालेल्या चुकीच्या वन-बंदोबस्तामुळे गावांच्या निस्तार वर्गवारीत झालेला बदल पृष्ठ २४-२५ वरील तक्त्यात दिला आहे.**

| वर्ष | सरप्लस | सेल्फ-सफिशिएंट | डेफिसिट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९५५ | ७(६३.६३%) | १(९.१%) | ३(२७.२७%) | ११(१००%) |
| १९९२ | १(९.१%) | ०(०%) | १०(९०.९०%) | ११(१००%) |

## कारणांचा शोध

डेफिसिट गावांच्या संख्येत व टक्केवारीत प्रचंड वाढ ही निस्तारा-संबंधात एक अतिशय गंभीर बाब आहे.

१) *लोकसंख्या-वाढ* - हे कारण खरे असले तरी ते सर्व गावांच्या बाबतीत खरे नाही. ११ पैकी ३ गावे आधीच डेफिसिट होती. उरलेल्यांपैकी फक्त एकच गाव, जे सेल्फ-सफिशिएंट होते ते, लोकसंख्या-वाढीच्या कारणाने डेफिसिट झाले आहे.

२) *वन-बंदोबस्त करताना वापरलेले चुकीचे निकष* - वाढलेल्या लोकसंख्येची गरज पूर्ण करू शकेल इतके वन-क्षेत्र गाव-परिसरात उपलब्ध असतानाही, चुकीचे निकष वापरून केलेल्या वन-बंदोबस्तामुळेच ६ सरप्लस गाव डेफिसिट झाली आहेत, हे या अभ्यासाने सिद्ध झाले आहे.

३) *भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम ४ व कलम ६*

*मधील तरतुदींची सुयोग्य काटेकोर अंमलबजावणी न करणे.*

अ) चुकीचे निकष वापरून होत असलेली, निस्तार धोरणावर दूरगामी विपरीत परिणाम करणारी कार्यवाही, ज्यांचे जीवन या निस्तारावर अवलंबून आहे असे लोक थांबवू शकले असते. पण कलम ४ व ६ प्रमाणे त्यांच्या भाषेत, म्हणजे गोंडी भाषेत, प्रत्येक गावात ही माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यात आली नाही.

ब) कलम ६ (अ) व (ब) ची सुद्धा सुयोग्य अंमलबजावणी करण्यात आली नाही. निस्तार पत्रकात खसरा नंबर लिहिलेले असले तरी त्याप्रमाणे प्रत्यक्ष वन-क्षेत्रात जमिनीवर डिमार्केशन कधीच करण्यात आले नाही. त्यामुळे काय बदल होत आहेत व त्यांचे आपल्या जीवनावर काय परिणाम होतील हे लोकांना कळलेच नाही. ते कळावे व लोकांनी योग्य वेळी आक्षेप घ्यावेत यासाठी प्रयत्नच करण्यात आले नाहीत.

४) *गडचिरोली जिल्ह्यातील वन-बंदोबस्ताचे राजपत्रात प्रकाशन स्थगित ठेवण्याचा शासकीय निर्णय कारणांचे निराकरण न करताच फिरविण्यात आला.* असे झाले नसते तरी हे संकट टळू शकले असते.


क) १९८९ सालीच लोकांनी या वन-बंदोबस्ताला विरोध केला होता. तत्कालीन गडचिरोली व आरमोरी विधानसभा-सदस्यांनीही याला तीव्र आक्षेप घेतला होता.

ड) परिणामस्वरूप मुख्य सचिव (महाराष्ट्र राज्य) व अर्थसचिव यांनी गडचिरोली जिल्ह्यात येऊन लोकांचे व लोक-प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले होते.

इ) सहसचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दि. ३० नोव्हेंबर १९८९ ला श्री. सुखदेवबाबू उईके, तत्कालीन विधानसभा-सदस्य व समिती-प्रमुख, अनुसूचित जमाती कल्याण समिती यांना पत्र क्र. एफ.एल.डी. ३६८५/९३१६/फ-२ द्वारा कळविले होते की -

"गडचिरोली जिल्ह्यातील वनजमिनीबाबत भारतीय वन अधिनियम

## गडचिरोली जिल्ह्यातील निस्तार हक्क असलेली वन-जमीन



१९२७ खालील कलम २० ची अधिसूचना प्रसिद्ध करणेसाठी शासनाने दि. २१.१०.८९ च्या पत्रान्वये स्थगिती दिलेली असून सर्व संबंधितांना तसे कळविण्यात आले आहे.''

असे असतानाही ज्या कारणांमुळे ही स्थगिती देण्यात आली होती, त्या कारणांचे निराकरण न करता ११ मार्च १९९३ रोजी शासनाने ही अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करून टाकली. असे झाले नसते तर ही चूक टाळता आली असती.

## – ३ –

## कुणाचे काय चुकले ? पुढे काय करावे ?

सरकारचा कायदा व धोरण या दोन्हीप्रमाणे लोकांचे निस्तार हक्क कायम असल्याचे दिसते. मग तरीही दिवसेंदिवस प्रत्यक्षात निस्तार हक्कांचा संकोच कां होत गेला ? लोकांना हक्क म्हणून निस्तार कां मिळत नाही ? आपल्या गावाजवळील परंपरागत निस्तार हक्काच्या जंगलातूनही निस्तार आणताना लोक स्वतःला चोर कां समजतात ? निस्तारासाठी लोकांना वने आवश्यक आहेत, तरी ती वेगाने कां नष्ट होत आहेत ? वनांच्या चिरस्थायी (सस्टेनेबल) व्यवस्थापनासाठी लोकसहभाग आवश्यक आहे, मग तरीही तो कां मिळत नाही ? असे झाले याकरता कुणा एकालाच पूर्णपणे जबाबदार धरता येणार नाही. प्रत्येकाला, आपले काय चुकले याचा शोध घेऊन, पुढे काय करावे ते ठरवावे लागेल.

### लोकांचे काय चुकले ?

* मालगुजारी व जमीनदारी नष्ट करण्याचा कायदा १९५० साली होऊन त्यांच्या ताब्यातील परंपरागत निस्तार हक्क असलेले सर्व जंगल, जमीन सरकारजमा झाली. त्यानंतर १९५३ ते ५६ निस्तार चौकशी झाली. तेव्हा जागृत राहून लोकांनी चौकशीत भाग घेतला नाही.

* निस्तार हक्क लागू असलेले जंगल गावाच्या ताब्यात असले पाहिजे अशी मागणीही केली नाही; मग आग्रह धरणे तर दूरच राहिले. शासनाने अशा जंगलांचे व्यवस्थापन व उपयोग या संबंधात अनेक बदल केले, पण त्यांच्यावर विचार करून, ते योग्य की अयोग्य असे मत बनवून, त्याचे सामूहिक प्रगटीकरण लोकांनी केले नाही.

* चूक किंवा बरोबर, असे जे निस्तार पत्रक तयार करण्यात आले, त्याची लोकांनी कधीही माहिती करून घेतली नाही.

* हक्क म्हणून निस्तार मिळाला पाहिजे असा आग्रह न धरता चोरीच्या मार्गाचा आधार घेतला. दुसऱ्याचे काहीही होवो, आपला स्वार्थ साधला म्हणजे झाले, असा दृष्टिकोन ठेवून लोक वागले. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही आर्थिक भ्रष्टाचार करण्यासाठी सोयीचे म्हणून चोरीला प्रोत्साहन दिले. लोकही हक्कासाठी संघर्षाचा मार्ग न स्वीकारता प्रलोभनाला बळी पडले.

* लोकांच्या निस्तार हक्काच्या जंगलातही ठेकेदार किंवा सरकारने तोड केली, तेव्हा लोकांनी विरोध केला नाही. उलट नगदी पैशाच्या रूपात मिळणाऱ्या मजुरीकरता लोकांनीच स्वतः त्यांना ते जंगल तोडून दिले, व ट्रका भरून बाहेर नेण्यासाठी मदत केली.

* तात्कालिक संकुचित स्वार्थासाठी लोकांनी स्वतःच्या भविष्याच्या किंवा पुढील पिढीच्या जगण्याच्या हक्काचाही विचार केला नाही.

## सरकारचे काय चुकले ?

* सुयोग्य निस्तार चौकशी करण्यासाठी आणखी कोणकोणत्या विषयांचे ज्ञान व कौशल्य आवश्यक आहे, याचा विचार न करता फक्त राजस्व विभागाकडे चौकशीचे काम सोपवून सरकारने चूक केली. समाजशास्त्र, वनस्पतिशास्त्र, मानववंशशास्त्र, वानिकी व पारिस्थितिकी-शास्त्र (इकॉलॉजी) या विषयातील तज्ज्ञांना चौकशीच्या कामात सहभागी करून घेतले नाही.

* निस्तार चौकशी अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावात जाऊन, गाव बैठक घेऊन त्यांच्या मातृभाषेत निस्तार चौकशी केली नाही. निरक्षर गावकऱ्यांना चौकशीत सहभागी करून घेऊन त्यांचे मत, आक्षेप इ. नोंदविण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. उलट निरक्षर गावकऱ्यांना सहभागी होता येऊ नये अशा कार्यपद्धतीचाच स्वीकार केल्या गेला.

* तयार झालेले निस्तार पत्रक गावकऱ्यांना कधीही समजावून सांगण्यात आले नाही. निस्तार पत्रक व नकाशे कागदोपत्रीच राहिले. प्रत्यक्षात जमिनीवर त्यांचे चिन्हीकरण (डिमार्केशन) कधीही करण्यात आले नाही. त्यामुळे आपल्या निस्तार हक्काचे जंगल कोणते, याची माहिती लोकांना कधीच मिळाली नाही. एवढेच नव्हे तर, जमिनीवर निस्तार हक्क नेमके कुठे व कशाकरता आहेत याची माहिती सरकारलाही राहिली नाही.

* अशा निस्तार हक्कांच्या वनाच्या सुयोग्य शास्त्रीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने तथाकथित प्रयत्न म्हणूनही, सूक्ष्म कार्य-आयोजना तयार करण्याचा कधीही प्रयत्न करण्यात आला नाही. निस्तार वनांची उपयोगिता कायम रहावी म्हणून त्यांच्या चक्रीय (रोटेशनल) वापराचे निर्धारणही कधी केले गेले नाही.

* निस्तार हक्क लागू असलेल्या वनांचे लोक-सहभागाने नियोजन, संवर्धन व व्यवस्थापन याकरता सुयोग्य कार्यक्रमांचा कधीही विचार केला नाही.

* एकीकडे लोकांच्या निस्तार हक्कांना महत्त्व न देता नगदी पैशाच्या रूपात मिळणाऱ्या राजस्वालाच प्राधान्य देण्यात आले, तर दुसरीकडे उद्योगपती व कारखान्यांना कच्च्या मालात दीर्घकालीन प्रचंड सूट देऊन राजस्व व नैसर्गिक साधनसंपत्तीचे अपरिमित नुकसानही केले.

* लोकांना प्रत्यक्षात निस्तार हक्क कायमस्वरूपी मिळत रहावेत याकरता सुयोग्य व्यवस्थापकीय योजना न करता वन-बंदोबस्ताची (फॉरेस्ट सेटलमेंट) कागदोपत्री कार्यवाही करण्यात आली व त्यात अशास्त्रीय निकष

वापरून मोठ्या प्रमाणात लोकांचे निस्तार हक्क कमी करून राखीव वने घोषित करून टाकण्याची मोठी चूक शासनाने केली आहे.

* प्रती व्यक्ती व जनावर निस्ताराची गरज व त्याकरता सुयोग्य वन-जमिनीच्या क्षेत्रफळाचे निर्धारण, याकरता निकष ठरविताना कोणत्याही शास्त्रीय पद्धतीचा वापर केला नाही. लोकांना निकष ठरविण्याच्या प्रक्रियेत सहभागी न करून घेता चुकीचे निकष लोकांवर लादण्यात आले.

## लोकांनी यापुढे काय करावे ?

* आपल्या गावाच्या सभोवतालच्या जल, जंगल व जमिनीच्या सुयोग्य व्यवस्थापनाची जबाबदारी गावसमाजाने स्वीकारली तरच निस्तार हक्क मिळू शकतील, हे लोकांनी समजून घ्यावे.

* चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील निस्तार धोरणाचा आढावा घेऊन सुयोग्य उपाययोजना सुचविण्याकरता शासनाने आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. समितीने सुचविलेल्या उपाय-योजनांचा अभ्यास लोकांनी करावा व त्यांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरावा.

* लोक व जनावर यांच्या निस्ताराकरता किती जमीन राखून ठेवावी याचे निकष ठरविण्याकरता मित्र व तज्ञांच्या मदतीने स्वतः गाव-पातळीवर कृती-संशोधन हातात घ्यावे. लोक-सहभागाने शास्त्रीय निकष ठरेपर्यंत १९५६ मध्ये निस्ताराकरता राखून ठेवलेले क्षेत्र कमी करू देऊ नये. चुकीचे निकष वापरून केलेली वन-बंदोबस्ताची, व त्याआधारे झालेली राखीव वने घोषित करण्याची कार्यवाही रद्द ठरवावी.

* राजस्व व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना गावात बोलावून, निस्तार पत्रकाच्या आधारे आपले निस्ताराचे हक्क कुठे आहेत हे प्रत्यक्ष जमिनीवर समजून घेऊन दगडी खुणा लावून चिन्हीकरण करावे. गावाकरता राखून ठेवलेले निस्तार क्षेत्र कमी आहे असे वाटल्यास गाव-परिसरात उपलब्ध अव्याप्त जमिनीवर गावाचे निस्तार हक्क नोंदवून घेण्यासाठी

जिल्हाधिकाऱ्यांकडे गावातील किमान एक-चतुर्थांश प्रौढ रहिवाशांच्या सहीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १६१-(३) नुसार अर्ज करावा व त्यानंतर होणाऱ्या चौकशीच्या कामात सक्रिय भाग घ्यावा.

## सरकारने काय करावे ?

* चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील निस्तार धोरणांचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या शासकीय समितीच्या अहवालाला त्वरित मंजुरी देऊन त्याची अंमलबजावणी करावी.

* लोक व जनावर यांच्या निस्तारासाठी किती जमीन राखून ठेवावी याबाबतच्या निकषांचे शास्त्रीय आधारावर पुनर्निर्धारण होईपर्यंत १९५५-५६ मध्ये तयार केलेल्या निस्तार पत्रकातील निस्तार हक्क कमी करू नयेत.

* १९८८ च्या भारतीय वननीतीत म्हटल्याप्रमाणे वनात व वनाजवळ राहणाऱ्या लोकांच्या निस्तार हक्कांना वनोत्पादनाच्या व्यापारी व औद्योगिक वापराच्या तुलनेत प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

* जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १६१ मध्ये म्हटल्याप्रमाणे निस्तार पत्रकासोबतच निस्तार व्यवस्थे-संबंधीची योजना त्वरित तयार करावी. असे करताना लोक व त्यांच्यासोबत कार्यरत स्वयंसेवी संस्थेला निर्णय-प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

* भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ प्रमाणे 'ग्रामवन' घोषित करून ते गावसमाजाचे हाती सोपविण्यासाठी शासनाने ग्रामवनाचे नमुना नियम (मॉडेल रूल्स) व मार्गदर्शक तत्त्वे ठरवावीत व त्या मर्यादेमध्ये स्वतःचे नियम स्वतः ठरविण्याचा त्या गावसमाजाचा अधिकार मान्य करावा, व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने अंमलबजावणी करावी.

| गावाचे नाव | जनगणना कोड नं. | | निस्तारासाठी वनक्षेत्र हेक्टर | आरक्षित वन हेक्टर | निस्तारासाठी ठेवलेले क्षेत्र हेक्टर | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९८१ | १९९१ | १९५५ | १९९२ | १९९२ | १९५५ | १९९ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| मेंढा (लेखा) | ५४१ | ७८ | १७८८.०६ | १६३९.२१ | १४९.८५ | २०० | ३६७ |
| जापी | ७६९ | २६३ | १२५५.३ | ९५५.७७ | २९९.५३ | २०० | ३०० |
| काकडयेली | ५४३ | १७५ | ८५२.९३ | ३१०.४५ | ५४२.४८ | २२८ | ३१५ |
| हिंगे | ३५३ | १३२ | ५५५.५२ | ५०९.२४ | ४६.२८ | १४० | १६५ |
| येरंडी | ५२४ | १७० | ४७०.५३ | ४००.०९ | ७०.४४ | १८१ | २०५ |
| मारकेगाव | ५३९ | ७९ | ४१४.४७ | ३१३.७६ | १००.७१ | १८० | २५० |
| पारसवाडी | ५४५ | १७७ | ३९० | ३२४.६६ | ६५.३४ | १५० | १७१ |
| राजोली | ५२६ | १७१ | ३६९ | २४६.७५ | १२२.२५ | ४३० | ४८० |
| लेखा | ५२७ | ७७ | २७९.९२ | ६२.३९ | ११७.५३ | २६० | ४२१ |
| पांढसडा | ५८७ | १८३ | २१७.५४ | १३६.३४ | ८१.२ | १४० | २७५ |
| खरकाडी | ५३० | ६८ | ५०.८९ | ०.० | ५०.८९ | १५० | २२० |

| जळणाची गरज मे.टन | | जळाऊ लाकडाचे उत्पादन मे. टन | | सरप्लस/डेफिसिट मे. टन | | सरप्लस/डेफिसिट हेक्टर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५५ | १९९२ | १९५५ | १९९२ | १९५५ | १९९२ | १९५५ | १९९२ |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| ५४.०० | ९९.०९ | ३५७.६१ | २९.९७ | ३०३.६१ | -६९.१२ | १५१८.०५ | -३४५.६० |
| ५४.०० | ८१.०० | २५१.०६ | ५९.९० | १९७.०६ | -२१.१० | ९८५.३० | -१०५.५० |
| ६१.५६ | ८५.०५ | १७०.५८ | १०८.४९ | १०९.०२ | २३.४४ | ५४५.१० | ११७.२० |
| ३७.८० | ४४.५५ | १११.१० | ९.२५ | ७३.३० | -३५.३० | ३६६.५० | -१७६.५० |
| ४८.८७ | ५५.३५ | ९४.०० | १४.०८ | ४५.१३ | -४१.२७ | २२६.१५ | -२०५.६० |
| ४८.६० | ६७.५० | ८२.८९ | २०.१४ | ३४.२९ | -४७.३६ | १७१.४५ | -२३६.८० |
| ४०.५० | १६.१७ | ७८.०० | १३.०६ | ३७.५० | -३.११ | १८७.५० | -१६५.५५ |
| ११६.१० | १२९.६० | ७३.८० | २४.४५ | -४२.३० | -१०५.१५ | -२११.५० | -५२५.७५ |
| ७०.२० | ११३.६७ | ५५.९८ | २३.५० | -१४.२२ | -९०.१७ | -१७.१० | -४५०.८५ |
| ३७.८० | ७४.२५ | ४३.५० | १४.८५ | ५.७० | -५९.४० | २८.५० | -२९७.०० |
| ४०.५० | ५९.४० | १०.१७ | १०.१७ | -३०.३३ | -४९.२३ | -१५१.६५ | -२४६.१५ |

– ४ –

# महाराष्ट्र शासनाच्या समितीने सुचविलेली निस्तारासंबंधीची प्रस्तावित उपाययोजना

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. एस् ३०/२०००/ प्रक. २१५/ फ-६ दिनांक १० नोव्हेंबर २००० व समपत्र दिनांक १०-५-२००१ अन्वये महाराष्ट्र राज्य शासनाने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील निस्तार धोरणांचा आढावा घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित केली होती -

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर | अध्यक्ष |
| २) | जिल्हाधिकारी, चंद्रपूर | सदस्य |
| ३) | जिल्हाधिकारी, गडचिरोली | --,,-- |
| ४) | मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर | --,,-- |
| ५) | मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली | --,,-- |
| ६) | श्री. मोहन हिराबाई हिरालाल, संयोजक, 'वृक्षमित्र', गडचिरोली/चंद्रपूर | अशासकीय सदस्य (गडचिरोली जिल्हा) |
| ७) | डॉ. ए.पी. पिल्लाई, प्राचार्य, एस्.पी. विधी महाविद्यालय, चंद्रपूर | --,,-- (चंद्रपूर जिल्हा) |
| ८) | वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर वन वृत्त | सदस्य |
| ९) | वनसंरक्षक, दक्षिण चंद्रपूर वन वृत्त | --,,-- |
| १०) | प्रादेशिक व्यवस्थापक, वनविकास महामंडळ, उत्तर चंद्रपूर | --,,-- |
| ११) | उप-वनसंरक्षक (नियोजन), उत्तर चंद्रपूर वनवृत्त | सदस्य सचिव |

या समितीने जून २००२ मध्ये शासनाला दिलेल्या अहवालातील प्रस्तावित उपाययोजनेसंबंधीचा अंश पुढीलप्रमाणे -

## प्रकरण ५
## प्रस्तावित उपाययोजना

### (अ) निस्तार

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील निस्तार धोरणाचा आढावा घेण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीने निस्ताराबाबतचा पूर्व-इतिहास, निस्ताराची प्रचलित पद्धती, निस्तारातील अडचणी विचारात घेऊन उपाययोजना सुचविल्या आहेत. ग्रामस्थांच्या आवश्यकतेनुसार व उपलब्धतेच्या चौकटीत सुसूत्रपणे निस्तारासाठी आवश्यक वनोपजाचा पुरवठा होईल अशी कायदेशीर व्यवस्था केल्यास ग्रामस्थांना लगतच्या वनक्षेत्राबाबत आस्था निर्माण होईल व व्यापारी उद्देशाने होणारी सर्व अवैध वृक्षतोड यावर ग्रामस्थांची देखरेख राहून वनसंवर्धन प्रभावीपणे होईल. निस्तार-पुरवठ्याकरिता वन-व्यवस्थापनात लोकांना सहभागी करून घेणे सहज शक्य आहे. निस्ताराकरिता उपाययोजना सुचविताना समितीने खाली दर्शविलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेतली आहेत.

**मार्गदर्शक तत्त्वे**

१) भारतीय संविधानाने राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्याची दिलेली हमी, जंगलात व जंगलालगत राहणाऱ्या ग्रामस्थांच्या गरजांची पूर्ती होऊन वनविकासाच्या कामामुळे ग्रामस्थांच्या आर्थिक स्रोतात भर पडून आर्थिक स्थिती सुधारल्याने इतर समाजाचे बरोबरीने येण्यास संधी मिळू शकेल.

२) भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ नुसार प्राप्त झालेला मूलभूत जगण्याचा हक्क म्हणजेच आवश्यक अन्न, पाणी, जळण, चारा, शेतीसाठी अवजारे व घरासाठी लागणारे लाकूड, माती, दगड, मुरूम, गिट्टी इत्यादी गाव-परिसरातून विनामूल्य किंवा सवलतीच्या दराने प्राप्त करणे हा आदिवासी व ग्रामीण जनतेचा परंपरागत हक्क आहे. त्याचे संरक्षण करून

त्याची सुयोग्य व्यवस्था लावणे.

३) भारत सरकारच्या राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार वन-व्यवस्थापनेचे उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट वनाची उत्पादन-क्षमता विचारात घेऊन ग्रामीण व आदिवासी जनतेची जळणाची, चाऱ्याची, गौण वनोपजाची व घरासाठी लागणाऱ्या लहान इमारती लाकडाची गरज भागविणे असे आहे. वनात व वनाजवळ राहणाऱ्या आदिवासी व इतर गरीबांचे जीवन वनासोबत गुंफले आहे. ते उपभोगत असलेल्या हक्क व सवलतीचे पूर्णपणे संरक्षण करण्यात येईल. जळाऊ लाकूड, गौण वनोपज आणि लहान इमारती लाकडाच्या घरगुती गरजांना इतर वन-उत्पादनावर प्रथम प्राधान्य देणे, ह्या वस्तू त्यांना सोयीच्या जागी असलेल्या डेपोमधून माफक दराने उपलब्ध करून देणे.

४) सार्वजनिक मालकीच्या जल, जंगल, जमीन सारख्या पायाभूत साधनसंपत्तीचे सुयोग्य व्यवस्थापन लोकांच्या सहभागातून करणे.

५) गाव-समाज अधिक स्वावलंबी बनून त्याची स्वयंशासनाच्या दिशेने वाटचाल व्हावी, याकरिता राज्य शासनाने व सर्व जनतेने प्रयत्न करणे.

६) सर्व निर्णयप्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने महिलांचा सारखा सहभाग राहू शकेल अशी योजना व पद्धती आखणे.

**प्रस्तावित उपाययोजना**

सुरुवातीला गावालगतचे वनक्षेत्र निस्तारासाठी राखून ठेवले जात होते. त्या क्षेत्रात महसूल विभागाच्या व वन विभागाच्या अखत्यारीतील वनक्षेत्राचा समावेश होता. त्यापैकी काही क्षेत्र वेळोवेळी संरक्षित वने/राखीव वने म्हणून घोषित झालेले आहे. १९९२ साली झालेल्या अधिसूचनेमुळे पूर्वी असलेली संरक्षित वने कमी होऊन राखीव वनक्षेत्रात वाढ झालेली आहे. संरक्षित वनांत निस्ताराचे हक्क असल्याने व या प्रक्रियेमुळे संरक्षित वने कमी झाल्यामुळे त्याचाही परिणाम निस्तारावर

झाला. याबाबत श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांनी सादर केलेला गडचिरोली जिल्ह्यातील नमुना अभ्यास विचारात घेतला आहे. त्याशिवाय वन विभागाकडून काही क्षेत्र वनविकास महामंडळ व वन्यजीव विभागास वर्ग करण्यात आलेले आहे. १९५६ पूर्वीची व आजची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थिती यामध्ये बराच बदल झालेला आहे. त्याचा परिणाम वनोपजाचे उत्पादनावर झाला आहे. सध्याची महाराष्ट्र राज्यातील वनाची उत्पादन-क्षमता आणि मध्यप्रदेशामध्ये सध्या अंमलात असलेले निस्तार धोरण या बाबी निस्ताराच्या खालील उपाययोजना प्रस्तावित करताना विचारात घेतल्या आहेत.

१) ३३ टक्क्यांपेक्षा जास्त वनक्षेत्र असलेल्या गावाचे संपूर्ण वनक्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २८ अन्वये 'ग्रामवने' (village forests) घोषित करून व्यवस्थापनासाठी ग्रामसमाजाकडे सोपवावे. ग्रामवने करताना शासकीय पडीत जमीन किंवा वनजमीन जी खडकपहाड, झुडपी जंगल, मोठ्या झाडांचे जंगल किंवा अभिलेखात इतर कोणत्याही नावाने संबोधली असेल अशी सर्व प्रकारची जमीन, जी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२ अंतर्गत कुरण, जळतण, चराई करिता राखून ठेवली आहे, अशा जमिनीचा व भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २९ अन्वये अधिसूचित झालेल्या संरक्षित वनाचा प्रथम अंतर्भाव करावा. हे क्षेत्र जर कमी पडले तर गावालगतच्या राखीव वनाचा देखील ग्रामवने करताना विचार व्हावा व त्याअनुषंगाने ग्रामवने घोषित करावी. त्याकरिता लोकसहभागाने नियम त्वरित तयार करावे.

ग्रामवने गठित करण्याबाबत, त्यांचे व्यवस्थापन व प्रशासनाबाबतची कार्यप्रणाली जोडपत्र-१३ मध्ये नमूद केली आहे.

२) ३३ टक्क्यापेक्षा कमी वनक्षेत्र असलेल्या गावात जेथे शक्य आहे तेथे ग्रामवने घोषित करावी व जेथे शक्य नाही तेथे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसएलएफ/१०९१/प्र.क्र. ११९/फ-११, दि. १६-३-९२ अन्वये

घोषित केलेला 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' हा कार्यक्रम राबवावा व या योजनेतून मिळणारे १०० टक्के फायदे ग्रामस्थांना द्यावे. जी गावे 'ग्रामवन' किंवा 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' या कार्यक्रमात सहभागी झालेली आहेत अशा गावांच्या निस्ताराची गरज त्यांना हस्तांतरित केलेल्या वनक्षेत्रातूनच पूर्ण करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. याउपरही गरज शिल्लक राहिल्यास ती त्या गावाच्या दृष्टीने सोयीच्या जागी असलेल्या निस्तार आगारातून उपलब्ध असलेल्या वनोपजातून पूर्ण करण्यात यावी. पुढील कालावधीत १०० टक्के गावे 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापना'त सहभागी होतील असा प्रयत्न केला जावा.

३) निस्तार व्यवस्थापनात लोकांना सहभागी करून न घेतल्यामुळे त्यांच्यात जबाबदारी व कर्तव्याची जाणीव निर्माण झाली नाही. वन या महत्त्वाच्या संसाधनापासून लोकांची विलगीकरणाची प्रक्रिया वाढत गेली. त्यामुळे उत्पादनात घट होऊन जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवू लागला व पर्यावरणाचे संतुलन बिघडले. यावर मात करण्यासाठी वन-संरक्षण व वन-व्यवस्थापन यामध्ये ग्रामीणांचा सहभाग घ्यावा. छोटी गावे, पाडा, मोहल्ला यांमधील सर्व ग्रामस्थ मिळून होणाऱ्या ग्रामसभांना परिसरातील सार्वजनिक जल, जमीन, जंगलाच्या व्यवस्थापनाची कामे सोपवावीत.

४) जेथे 'ग्रामवने' किंवा 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' यात गाव-समाज सहभागी होईल तेथे शासनाच्या निरनिराळ्या योजना उदा. रोजगार हमी योजना, आश्वासित रोजगार योजना, मृद् व जलसंधारण कार्यक्रम, पाणलोट विकास कार्यक्रम, समन्वित ग्राम-वनीकरण समृद्धी योजना व तत्सम इतर योजना प्राधान्याने ग्राम-पातळीवर राबविण्यात याव्यात.

५) वनाच्या उत्पादन-क्षमतेनुसार 'निरंतर उत्पादन' (Sustained Yield) या शास्त्रीय तत्त्वावर उत्पादित होणाऱ्या वनोपजातूनच निस्तार

पुरवठा केला जाईल.

६) १९५६ ची ग्रामीण लोकसंख्या व आजची ग्रामीण लोकसंख्या यांचा तुलनात्मक विचार केल्यास ग्रामीण लोकसंख्येत जवळपास अडीच पटीने वाढ झालेली आहे. सहाजिकच त्यांच्या गरजाही वाढलेल्या आहेत आणि म्हणून जळाऊ सरपणासाठी होत असलेली वृक्षतोड थांबवता येत नाही. भारतीय वन-सर्वेक्षणाच्या अहवालानुसार (सन १९९९) महाराष्ट्रात दरवर्षी दरडोई ०.३१ मेट्रिक टन याप्रमाणे दरवर्षी १.७ कोटी मेट्रिक टन जळाऊ सरपणाची आवश्यकता आहे. परंतु महाराष्ट्रात जवळपास ८ लक्ष मेट्रिक टन जळाऊ सरपणाचे उत्पादन होते. यावरून असे निदर्शनास येईल की, सरपणाचा पुरवठा अगदी अल्प स्वरूपाचा (४.७ टक्के) असून आवश्यक ती गरज भागविण्यासाठी वनावर फार ताण पडलेला आहे. परिणामी वने निकृष्ट होत चाललेली आहेत. यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांद्वारे अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या - जसे सूर्यचूल, गोबर गॅस, बायोगॅस, गॅसीफायर, सौर ऊर्जा संयंत्रे - वापरण्याबाबतच्या योजना आहेत, त्या सर्व योजना वनक्षेत्रात व वनक्षेत्रालगतच्या गावांत प्रभावीपणे राबविण्याकरिता वनापासून ८ कि.मी. परिसरातील गावांमध्ये अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या विविध योजना राबविण्याकरिता प्राधान्य देण्यात यावे व अशा योजनेअंतर्गत जेथे सवलत उपलब्ध नाही, त्याठिकाणी ५० टक्क्यांपर्यंत सवलत उपलब्ध करून द्यावी व ज्या योजनेअंतर्गत योजना राबविण्यासाठी लाभार्थींना ज्या सवलती दिल्या जातात त्या ७५ टक्के पर्यंत जास्त वाढवून देण्यात याव्या, याकरिता सर्व शासकीय यंत्रणांना उद्युक्त करावे. म्हणजेच वनावरील सरपणाकरिता ग्रामस्थांचा असलेला अवलंब काही अंशी कमी होईल व ग्रामीण महिलांचे कष्ट कमी होतील. शिवाय सरपणाच्या धुरापासून ग्रामीण महिलांची सुटका होऊन त्यांचे स्वास्थ्य सुधारेल. परिणामी सामाजिक स्वास्थ्य देखील सुधारेल.

७) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील वार्षिक वनोपजाचे उत्पादन व ग्रामीण क्षेत्रातील लोकसंख्येचा विचार करता तत्कालीन मध्यप्रदेश शासनाच्या १९५६ च्या निस्तार धोरणानुसार वनोपजाचा आजच्या स्थितीत पुरवठा करणे शक्य नाही. त्यामुळे उपलब्ध वनोपजाची मात्रा व ग्रामीण भागातील लोकसंख्या यांचा विचार करून खालीलप्रमाणे प्रस्ताव करण्यात येत आहे -

I. समुपयोजन कूपातून उत्पादित होणाऱ्या वनोपजावर वनापासून ८ कि.मी. परिसरातील गावांचा पहिला हक्क राहील व सदर वनोपज निस्तार आगारावरून ग्रामस्थांना निस्तार दराने उपलब्धतेच्या प्रमाणात 'प्रथम येणाऱ्यास प्रथम' या तत्त्वावर पुरवठा करण्यात यावा. ग्रामस्थांच्या गरजा विचारात घेऊन मध्यप्रदेश राज्यात चालू असलेल्या निस्तार पद्धतीप्रमाणे वनपाल/वनरक्षक यांचे मुख्यालयाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार निस्तार आगार उघडण्यात यावेत व निस्तार आगारावरूनच वनोपजाचा पुरवठा करावा. गावातील दारिद्र्यरेषेखालील, भूमिहीन व अल्पभूधारक यांना निस्तारांतर्गत वनोपज निस्तार दराने वाटप करण्याकरिता प्राधान्य द्यावे. निस्तारांतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या वनोपजाचा तपशील खालीलप्रमाणे राहील -

*इमारती लाकूड*

| *तपशील* | | *परिमाण* |
|---|---|---|
| शेती-उपयोगी | - | ८ फाटे ४५ सें.मी. वेढी वर्गातील व १ खोड/प्रतिकुटुंब/प्रतिवर्ष |
| शेतमळ्यासाठी | - | ४ फाटे ४५ सें.मी. वेढी वर्गातील प्रतिकुटुंब तीन वर्षांतून एकदा |
| नांगर/वखर/तिफण याकरिता | - | तीन वर्षांतून एकदा १ नग/प्रतिकुटुंब |
| घर-दुरुस्तीकरिता | - | १० फाटे ४५ सें.मी. वेढी वर्गातील प्रतिकुटुंब |

| | | |
|---|---|---|
| नवीन बांधकामाकरिता | - | उपलब्धतेनुसार मागणीप्रमाणे |

*बांबू*

| | | |
|---|---|---|
| शेती-उपयोगाकरिता (शेतकरी) | - | ५० बांबू |
| शेतीव्यतिरिक्त उपयोगास | - | २५ बांबू |
| (बिगर शेतकरी) बुरडाकरिता | - | १५०० बांबू |

*सरपण*

जळाऊ बिट उपलब्धतेनुसार व मागणीनुसार.

विर्निदेशित दिनांकास उपलब्धतेपेक्षा मागणी अधिक झाल्यास उपरोक्त नमूद पुरवठ्याची मात्रा कमी होईल.

कूपांच्या समुपयोजनातून निस्ताराकरिता उपलब्ध होणाऱ्या वनोपजाची आगारवार माहिती, तसेच प्रती लाभार्थी पुरवठा करावयाची वनोपजाची मात्रा संबंधित उपवनसंरक्षकाने दरवर्षी १ जानेवारीपर्यंत संबंधित संवर्ग अधिकारी यांना द्यावी. संवर्ग अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतीशी संपर्क साधून निस्ताराअंतर्गत पुरवठा करावयाच्या वेगवेगळ्या वनोपजाची मात्रा निश्चित करावी. अशाप्रकारे निश्चित केलेल्या मात्रेनुसार त्यांनी लाभार्थींना अधिकारपत्र जारी करावे. हे अधिकारपत्र विशिष्ट निस्तार आगाराकरिता राहतील. व अशा अधिकारपत्र-धारकास उपलब्ध असलेल्या मात्रेतून निस्तार पुरवठा वन विभागाकडून केला जाईल.

II. ८ कि.मी. परिसरातील ज्या गावांना प्रस्तावित निस्ताराअंतर्गत वनोपज-पुरवठा होत आहे अशी गावे 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' या कार्यक्रमात पुढील पाच वर्षांच्या कालावधीत सहभागी झाली नाहीत तर त्यांना निस्तार सवलत लागू राहणार नाही.

III. बांबू कारागिरांना त्यांच्या कामासाठी आवश्यक असा बांबू मिळावा याकरिता प्रस्तावित बांबू-पुरवठा त्वरित होण्यासाठी पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. ग्रामवन समिति किंवा वन-संरक्षण

समितीला त्यांच्या क्षेत्रातील बांबू-कारागिरांना, उपलब्धतेनुसार व वनसंवर्धनतेला इजा न पोहोचता, निष्कासन केलेला बांबू, बांबूच्या निस्तार दराने निस्तार-वाटपासाठी त्वरित देण्यात यावा.

IV. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग पत्र क्रमांक बीएसएफ/२०६३/१८४१८ दिनांक २०-५-६९ मध्ये दिलेल्या निकषाचे, निस्ताराकरिता किती जमीन राखून ठेवावी याबाबतच्या निकषाचे शास्त्रीय आधारावर पुनर्निर्धारण करण्यात यावे.

V. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या (सन १९९९) अहवालानुसार भारतात सरासरी प्रतिव्यक्ती प्रतिवर्ष जळाऊ लाकडाची गरज ६३५ कि. ग्रॅम आहे. तसेच महाराष्ट्रातील प्रतिव्यक्ती प्रतिवर्ष जळाऊ लाकडाची गरज ३१८ कि. ग्रॅम आहे. चंद्रपूर, गडचिरोली हे वनव्याप्त, आदिवासी लोकसंख्या जास्त असलेले जिल्हे असल्याने वनाची उत्पादकता व स्थानिक ग्रामीणांची गरज आधारभूत धरून आवश्यक ती आकडेवारी गोळा करण्यात यावी व त्याआधारे चंद्रपूर/गडचिरोली जिल्ह्याकरिता भविष्यात गाववार निस्ताराकरिता सुयोग्य योजना तयार करण्यात यावी.

सुयोग्य योजना तयार करण्याकरिता शासकीय संस्था व अशासकीय संस्था यांची मदत घ्यावी. उदा. रिमोट सेंसिंग एजंसी (हैद्राबाद), सेंटर फॉर इकोलॉजिकल सायंसेस (बंगलोर), संख्याशास्त्र विभाग (पुणे विद्यापीठ, पुणे).

VI. वन विभागांतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या निस्तार वनोपजावर आकारण्यात येणारे कर, उदा. फाट्यांवर वनविकास कर १२ टक्के, विक्री कर ८ टक्के व विक्रीकरावर अधिभार १० टक्के लावला जातो व जळाऊ लाकडांवर वनविकास कर १२ टक्के लावला जातो. हे कर ग्रामस्थांकडून वसूल केल्या जातात. तरी निस्तार वनोपजावर आकारण्यात येणारे कर रद्द करण्यात यावे, जेणेकरून ग्रामस्थांवर त्यांचा अधिकचा आर्थिक बोझा पडणार नाही.

VII. मोठ्या झाडाचे जंगल / झुडपी जंगल, जे महसूल खात्याच्या ताब्यात आहे, त्यावर पूर्वी निश्चित केलेले निस्तार हक्क अबाधित राहतील. सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी द्यावयाचे झाल्यास निस्तार हक्काचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी देण्यात यावे. तसेच मोठ्या झाडाचे जंगल / झुडपी जंगल वन विभागाकडे वर्ग करून त्या क्षेत्रात निस्तार हक्क कायम राहतील असे प्रावधान करावे.

VIII. जे क्षेत्र अव्याप्त आहे अशा क्षेत्रावरील वनोपजाचे निस्तारांतर्गत व्यवस्थापन हे जिल्हाधिकाऱ्यामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १६१ ते १६७ प्रमाणे करण्याची तरतूद आहे, तरी या तरतुदीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी निस्तार पत्रक तयार करून अव्याप्त क्षेत्राच्या व्यवस्थापनाची योजना त्वरित तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू करावी.

IX. चराई हा प्रकार देखील निस्तारात मोडतो. गुरे-चराईचा भार वाढल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे परिणाम दिसून येत नाहीत. सन १९८७ च्या शिरगणनेनुसार महाराष्ट्रात ३.४३ कोटी पशुधन आहे. यातील जवळपास १० टक्के गुरे वनावर अवलंबून आहेत. गडचिरोली जिल्ह्यात ५.६५ लाख व चंद्रपूर जिल्ह्यात ६.६६ लाख गाई-म्हशी आहेत. भारतीय सर्वेक्षण अहवालानुसार दरडोई १.२५ मेट्रिक टन वैरण लागते. त्यानुसार ७.०६ लक्ष टन गडचिरोली जिल्ह्यासाठी तर ८.३३ लक्ष टन चारा चंद्रपूर जिल्ह्यासाठी लागेल. तेव्हा प्रचलित असलेले चराईचे धोरण यापुढेही सुरू ठेवावे. ज्या गावांच्या ५ कि.मी. अंतराच्या आंत वनीकरण, मुख्य कूप कटाई अशा प्रकारची क्षेत्रे येतील तसेच सामाजिक वनीकरणाच्या योजनेमुळे गावानजीकची जी क्षेत्रे वनीकरणाखाली आली आहेत अशी क्षेत्रे चराईसाठी बंद राहणार असल्यामुळे या क्षेत्रालगतच्या गावांकरिता गोठा चराई (Stall Feeding) या पद्धतीचे अवलंबन करावे.

X. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात ८ वनविभाग येतात. यापैकी ५

वन विभागांची कार्यआयोजना संपलेली आहे. कार्यआयोजना संपली असल्याने त्याठिकाणी कूप समुपयोजनाची कामे, तसेच इतर वनसंवर्धनाची कामे उदा. कट ब्यॅक ऑपरेशन, कूप स्वच्छता, फुटवा एकेरीकरणाची कामे बंद आहेत. त्यातून बऱ्याच प्रमाणावर ग्रामस्थांना निस्ताराचा पुरवठा होत होता. परंतु कार्यआयोजना बंद असल्यामुळे त्याचा परिणाम निस्तार-पुरवठ्यावर झाला आहे. तेव्हा संबंधित वन विभागांची कार्यआयोजना त्वरित लिहून त्यास केंद्र शासनाची मान्यता घेऊन कार्यआयोजनेची तत्काळ अंमलबजावणी करावी.

– ५ –

## ग्रामवन

**– तसनीम अहमद**

भारतीय वन अधिनियम कलम ३ मध्ये समाविष्ट केलेल्या सर्व जमिनी सरकारच्या फायद्याकरता 'आरक्षित वन' म्हणून जाहीर करण्याची गरज नाही. त्यातील काहींना गावकऱ्यांच्या फायद्यासाठी 'ग्रामवन' घोषित करणे योग्य ठरेल. आजही त्यांचे त्या वनांवर व्यापक अधिकार आहेतच. ग्रामवन एका प्रकारे संरक्षित वनच आहे, कारण त्याचे व्यवस्थापन सरकारी अधिकाऱ्यामार्फत केले जाते; परंतु त्यापासून होणारे अतिरिक्त उत्पन्न गाव-समाजाला मिळते. ग्रामवन म्हणजे जमीन-महसूल बंदोबस्तानुसार गावकऱ्यांना दिलेली गावातील पडीत जागा नव्हे; तर खरेखुरे जंगलच. वन अधिनियमाने प्रकरण ३ मध्ये ग्रामवनाबाबत तरतुदी केल्या आहेत.

वन-अधिनियमानुसार ग्रामवन घोषित करण्याची प्रक्रिया 'आरक्षित वन' घोषित करण्याच्या प्रक्रियेसारखीच आहे. फरक एवढाच की प्रकरण ३, कलम २८, पोटकलम (१) नुसार राज्य सरकार औपचारिक आदेशान्वये आरक्षित क्षेत्र एका किंवा एकाहून जास्त खेड्यांच्या - ज्यांना त्यापासून फायदा होणे अपेक्षित आहे - नावे करते. आधीपासूनच आरक्षित

असलेले क्षेत्र अशा प्रकारे नावे करण्यात येऊ शकते, किंवा नव्याने एखादे क्षेत्र ग्रामवन म्हणून आरक्षित केले जाऊ शकते. नव्याने आरक्षण केले असेल तर अधिकारांची निश्चिती करणे अधिक सोपे असेल, कारण ज्या खेड्यासाठी ग्रामवन निर्धारित करण्यात येत असेल, त्या खेड्याला अधिकार असतील. इतर व्यक्ती वा संस्थांच्या अधिकारांचीच फक्त निश्चिती करावी लागेल, आणि याची क्वचितच वेळ येईल. चराई, लाकूडतोड इ. बद्दलचे खेड्याचे अधिकार, दुसऱ्या कोणाच्या संपत्तीवरचे अधिकार अशा स्वरूपाचे राहणार नाहीत; ते खेड्याच्या स्वतःच्या नावे असलेल्या संपत्तीचा उपभोग घेण्याच्या स्वरूपाचे असतील. नियम आणि व्याख्या, गुरांची संख्या, चराईचा काळ, किती झाडे तोडता येतील, जळणासाठी लहान झाडांचे किती क्षेत्र वापरता येईल - या सगळ्या गोष्टी वनाच्या योग्य वापराबाबतच्या कार्य-योजनेचा भाग बनतील. अशी वार्षिक किंवा अन्य नियत-कालिक कार्ययोजना तयार करावीच लागेल. अशा कार्ययोजनेत केलेल्या शिफारसींचा नियमांत समावेश करता येईल, ज्यामुळे त्यांना कायद्याचे बळ (कलम २८, पोटकलम २) प्राप्त होईल आणि अशा वनांचे संरक्षण आणि त्यांची सुधारणा यांबाबत गाव-पातळीवरील संस्थांची कर्तव्ये आखून देता येतील. बाहेरच्या कोणाला काही अधिकार असतील तर ते वगळता वनातील सर्व मोकळ्या भागात चराई होऊ शकेल आणि सर्व वार्षिक उपज गावाला मिळेल. गाव-पातळीवरील अधिकारी प्रत्येकाला त्याच्या शेतजमिनीच्या प्रमाणात ती वाटून देतील, आणि याची नोंद ठेवतील. विक्रीसाठी काही अतिरिक्त उपज शिल्लक असल्यास, विक्रीतून आलेल्या उत्पन्नाचा विनियोग कसा करायचा हे ठरवावे लागेल. सामूहिक उपयोगाच्या शाळा, रस्ते, पूल अशा गोष्टींसाठी, किंवा गरजूंना सरकारी कर्ज फेडण्यात मदत करण्यासाठीच त्याचा उपयोग व्हावा. गावकऱ्यांना त्यातील थोडे-थोडे पैसे वाटले जाऊ नयेत.

ग्रामवन म्हणून आरक्षित वन गावाला सोपवण्यामागे कल्पना अशी

नाही की खाजगी संपत्ती मानून त्याचा मन मानेल तसा वापर केला जावा; कल्पना ही आहे की संपूर्ण गाव-समाजाच्या फायद्यासाठी त्या वनाचे रक्षण आणि व्यवस्थापन केले जावे.

कलम २८, पोटकलम (३) मध्ये ग्रामवनाची तरतूद, त्या वनाचे नीट रक्षण आणि देखभाल व्हावी, म्हणून आहे.

– ६ –

## निस्तार हक्क : अर्थ आणि स्थिती

**- के. के. नायडू**

'निस्तार' एक संस्कृत शब्द आहे. त्याचा अर्थ आहे, 'पार जाणे, सुटका करून घेणे, मुक्त होणे, कर्ज फेडणे, निर्दोष सुटणे, परतफेड करणे, एखादी गोष्ट जिंकून घेण्याचे, तिच्यावर मात करण्याचे साधन किंवा उपाय.' मराठीतही त्याचा हाच अर्थ आहे.

'द लॉ ऑफ ॲग्रिकल्चरल टेनन्सी अँड व्हिलेज सर्व्हिस लँड्स इन द सेंट्रल प्रॉव्हिन्सेस' ('मध्यप्रांतातील कूळकायदा आणि ग्रामोपयोगी भूमीबद्दलचा कायदा') या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात श्री. आर. एम. हजरनवीस म्हणतात, ''निस्तार हक्क हे ब्रिटिश कायद्यानुसार सामूहिक उपयोगाच्या जमिनीबद्दलच्या अधिकारांच्या प्रकारचे आहेत असे वाटू शकते. ब्रिटिश कायद्यानुसारचे हे अधिकार एका किंवा त्याहून जास्त व्यक्तींचे दुसऱ्या व्यक्तीच्या जमिनीवरील अधिकाराच्या प्रकारचे होते. मध्यप्रांताच्या ज्या भागात जमीनदारी व्यवस्था होती, त्या भागात हे हक्क वाजिब-उल-अर्ज, अर्थात् गाव-प्रशासन पत्रिकेत नोंदवण्यात आले होते. 'वाजिब-उल-अर्ज' एक अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ आहे, 'नोंद करण्याची आवश्यकता आहे असा.' बेडन-पॉवेल ने नमूद केल्याप्रमाणे ही गावातील प्रथा, व्यवस्थापनाचे नियम यांची नोंद आहे. विशेषतः सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, मध्यप्रांत यांत असे दस्तावेज तयार करण्यात आले होते.

नाही की खाजगी संपत्ती मानून त्याचा मन मानेल तसा वापर केला जावा; कल्पना ही आहे की संपूर्ण गाव-समाजाच्या फायद्यासाठी त्या वनाचे रक्षण आणि व्यवस्थापन केले जावे.

कलम २८, पोटकलम (३) मध्ये ग्रामवनाची तरतूद, त्या वनाचे नीट रक्षण आणि देखभाल व्हावी, म्हणून आहे.

– ६ –

# निस्तार हक्क : अर्थ आणि स्थिती

– के. के. नायडू

'निस्तार' एक संस्कृत शब्द आहे. त्याचा अर्थ आहे, 'पार जाणे, सुटका करून घेणे, मुक्त होणे, कर्ज फेडणे, निर्दोष सुटणे, परतफेड करणे, एखादी गोष्ट जिंकून घेण्याचे, तिच्यावर मात करण्याचे साधन किंवा उपाय.' मराठीतही त्याचा हाच अर्थ आहे.

'द लॉ ऑफ ॲग्रिकल्चरल टेनन्सी अँड व्हिलेज सर्व्हिस लँड्स इन द सेंट्रल प्रॉव्हिन्सेस' ('मध्यप्रांतातील कूळकायदा आणि ग्रामोपयोगी भूमीबद्दलचा कायदा') या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात श्री. आर. एम. हजरनवीस म्हणतात, ''निस्तार हक्क हे ब्रिटिश कायद्यानुसार सामूहिक उपयोगाच्या जमिनीबद्दलच्या अधिकारांच्या प्रकारचे आहेत असे वाटू शकते. ब्रिटिश कायद्यानुसारचे हे अधिकार एका किंवा त्याहून जास्त व्यक्तींचे दुसऱ्या व्यक्तीच्या जमिनीवरील अधिकाराच्या प्रकारचे होते. मध्यप्रांताच्या ज्या भागात जमीनदारी व्यवस्था होती, त्या भागात हे हक्क वाजिब-उल-अर्ज, अर्थात् गाव-प्रशासन पत्रिकेत नोंदवण्यात आले होते. 'वाजिब-उल-अर्ज' एक अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ आहे, 'नोंद करण्याची आवश्यकता आहे असा.' बेडन-पॉवेल ने नमूद केल्याप्रमाणे ही गावातील प्रथा, व्यवस्थापनाचे नियम यांची नोंद आहे. विशेषतः सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, मध्यप्रांत यांत असे दस्तावेज तयार करण्यात आले होते.

झपाट्याने होणारे शहरीकरण, तथाकथित 'पडीत' जमिनीचे शेतीसाठी मुक्तहस्ते वाटप, निस्तारासाठी पर्यायी जमीन न ठेवता निस्तार हक्क समाप्त करणे इत्यादी. सगळ्यात अस्वस्थ करणारी बाब म्हणजे ही प्रक्रिया अखंड चालूच आहे. ७३ वी घटना-दुरुस्ती अजून पूर्णपणे लागू व्हावयाची आहे.

या दरम्यान विदर्भात, विशेषतः पूर्वी मध्यप्रांतात असलेल्या जिल्ह्यांमध्ये, एक विवादास्पद व अस्पष्ट स्थिती निर्माण झाली आहे.

पूर्वी मध्यप्रांतात असलेल्या जिल्ह्यांचे पुन्हा सर्वेक्षण करताना ही सगळी कोळिष्टके साफ करता आली असती आणि अधिकारांची स्पष्ट व्याख्या करता आली असती. परंतु हे सर्वेक्षण दुर्दैवाने काहीच साधू शकले नाही.

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे कलम १६१ लागू करणे हाच उपाय आहे. आजवर ते केवळ कागदावरच राहिले आहे.

एकदा का ते लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली की, आज दबलेल्या असलेल्या अनेक समस्या पुढे येतील. गाव-समाजांशी व्यापक विचार-विनिमय ही पहिली आवश्यक गोष्ट आहे. स्वयंसेवी संस्था या संबंधात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, आणि त्यांच्या सहकार्याचे उत्साहाने स्वागत करायला हवे.

## परिशिष्ट - १

# महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील निस्तार हक्क विषयक तरतुदी

### ख - भोगवट्यात नसलेल्या जमिनीबाबतचे अधिकार

*कलमे १६१ ते १६७ यांच्या तरतुदी लागू करणे*

**१६०.** या संहितेच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्यातील ज्या क्षेत्रास कलमे १६१ ते १६७ यांच्या तरतुदींशी अनुरूप असलेल्या तरतुदी लागू होत्या त्या क्षेत्रास या कलमाच्या तरतुदी लागू होतील; परंतु राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात निर्दिष्ट करण्यात येतील अशा राज्यातील इतर क्षेत्रांना उपरोक्त कलमे लागू करील.

*निस्तारपत्रक*

**१६१.** (१) या संहितेच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असेल असे, एखाद्या गावातील भोगवट्यात नसलेल्या सर्व जमिनीच्या आणि तिच्याशी आनुषंगिक असतील अशा सर्व बाबींच्या, आणि विशेषकरून कलम १६२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या व्यवस्थेसंबंधीची योजना अंतर्भूत असलेले एक निस्तारपत्रक जिल्हाधिकारी तयार करील.

(२) निस्तारपत्रकाचा मसुदा त्या गावामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. आणि जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या रीतीने गावातील रहिवाशांची मते अजमाविल्यानंतर जिल्हाधिकारी त्यास अंतिम स्वरूप देईल.

(३) ग्रामपंचायतीने विनंती केल्यानंतर, किंवा एखाद्या गावात ग्रामपंचायत नसल्यास अशा गावातील प्रौढ रहिवाशांपैकी कमीत कमी एक-चतुर्थांश रहिवाशांनी अर्ज केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही

वेळी, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर निस्तारपत्रकातील कोणत्याही नोंदीत सुधारणा करता येईल.

*निस्तारपत्रकात तरतूद करावयाच्या बाबी*

१६२. निस्तारपत्रकात पुढील बाबींची तरतूद करण्यात येईल -

(क) गावातील गुरे चारण्यास ज्या अटींवर आणि शर्तींवर परवानगी देण्यात येईल त्या अटी व शर्ती;

(ख) गावातील कोणाही रहिवाशास ज्या अटींवर आणि शर्तींवर आणि ज्या मर्यादेपर्यंत - (एक) लाकूड, इमारती लाकूड, सरपण किंवा जंगलातील इतर कोणतेही उत्पन्न;

(दोन) मुरुम, कंकर, वाळू, माती, चिकणमाती, दगड किंवा कोणतेही इतर दुय्यम खनिज, मिळेल

त्या अटी, शर्ती व मर्यादा;

(ग) गुरे चारण्याबाबत आणि परिच्छेद (ख) मध्ये नमूद केलेल्या वस्तू नेण्याबाबत सामान्यतः नियमन करणाऱ्या सूचना;

(घ) या संहितेअन्वये किंवा तदनुसार निस्तारपत्रकात नोंद करणे आवश्यक असेल अशी कोणतीही इतर बाब.

*विवक्षित बाबींची निस्तारपत्रकात तरतूद करणे*

१६३. निस्तारपत्रक तयार करताना जिल्हाधिकारी, शक्य असेल तेथवर, खालील गोष्टींची तरतूद करील :-

(क) शेतीसाठी उपयोग केला जाणाऱ्या गुरांना मोफत चराई;

(ख) गावातील रहिवाशांना आपल्या खरोखरच्या घरगुती उपयोगासाठी खालील वस्तू मोफत नेता येणे -

(एक) जंगलातील उत्पन्न;

(दोन) दुय्यम खनिज;

(ग) खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू गावातील कारागिरांना

त्यांच्या धंद्याकरिता घेऊन जाण्यासाठी द्यावयाच्या सवलती.

*दुसऱ्या गावातील पडीत जमिनीवरील अधिकार*

१६४. (१) कोणत्याही गावातील पडीत जमीन अपुरी आहे आणि लोकहिताच्या दृष्टीने या कलमान्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल ती चौकशी केल्यानंतर असा आदेश देता येईल की, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत त्या गावच्या रहिवाशांना शेजारच्या गावात, यथास्थिती, *निस्ताराचा* किंवा गुरे-चारण्याचा अधिकार राहील.

(२) पोट-कलम (१) अन्वये शेजारच्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा अधिकार असलेल्या एखाद्या गावातील रहिवाशांना असा अधिकार बजावता यावा यासाठी जाण्या-येण्याच्या आपल्या अधिकाराची नोंद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये केलेल्या अर्जाची चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास असे आढळून आले की, कोणत्याही दुसऱ्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा आपला अधिकार बजावणे शक्य व्हावे म्हणून अशा रहिवाशांना जाण्या-येण्याचा अधिकार असणे वाजवीरीत्या आवश्यक आहे, तेव्हा तो जाण्या-येण्याचा असा अधिकार आहे असे जाहीर करणारा आदेश देईल आणि ज्या शर्तींवर तो अधिकार बजावण्यात येईल त्या शर्ती नमूद करील.

(४) त्यानंतर जिल्हाधिकारी भोगवट्यात नसलेल्या जमिनीमधून जाण्यायेण्याचा मार्ग ठरवील आणि तो मार्ग ज्या गावातून जातो त्या गावाच्या रहिवाशांना कमीत कमी गैरसोयीचा होईल अशा रीतीने त्यावर निर्बंध घालील.

(५) जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटल्यास त्या मार्गाच्या सीमेची आखणी करता येईल.

(६) या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेले आदेश *निस्तार*

*पत्रकात* नोंदविण्यात येतील.

(७) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली गावे निरनिराळ्या जिल्ह्यांत असतील तर पुढील तरतुदी लागू होतील :-

(क) *निस्तारविषयक* अधिकार किंवा गुरे चारण्याचा अधिकार दर्शविणारे आदेश ज्या गावासंबंधात असा अधिकार मागण्यात आला असेल ते गाव ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी देईल;

(ख) जाण्या-येण्याच्या मार्गासंबंधीचे कोणतेही आदेश ज्या क्षेत्रातून असा मार्ग जात असेल त्या क्षेत्रावर ज्याचा संबंधित क्षेत्राधिकार असेल असा जिल्हाधिकारी देईल;

(ग) खंड (क) आणि (ख) अनुसार आदेश देणारा जिल्हाधिकारी संबंधित अशा इतर जिल्हाधिकाऱ्यांशी लेखी विचारविनिमय करील.

*वाजिब-उल-अर्ज*

**१६५.** (१) ही संहिता अमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर जिल्हाधिकारी, राज्य शासनाने त्या संबंधात दिलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशानुसार, जी कोणतीही जमीन किंवा जे पाणी राज्य शासनाच्या किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीचे नसेल किंवा त्याच्याकडून ज्याचे नियंत्रण किंवा व्यवस्था केली जात नसेल अशा जमिनीतील किंवा पाण्यासंबंधातील -

(क) पाटबंधाऱ्यांबाबतचा हक्क किंवा जाण्या-येण्याचा हक्क किंवा अन्य वहिवाटी,

(ख) मच्छीमारीबाबतचे हक्क,

या संबंधीचे प्रत्येक गावातील रिवाज ठरवील आणि त्यांची नोंद करील आणि अशा प्रकारच्या अभिलेखास त्या गावचा *वाजिब-उल-अर्ज* म्हणून संबोधण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेला अभिलेख, जिल्हाधिकारी त्यास योग्य वाटले अशा रीतीने प्रसिद्ध करील आणि असा

अभिलेख पोट-कलम (३) अन्वये दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल.

(३) अशा अभिलेखात केलेल्या कोणत्याही नोंदीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला पोट-कलम (२) अन्वये असा अभिलेख प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, ती नोंद रद्द करण्याकरिता किंवा तीत फेरबदल करण्याकरता दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल.

(४) त्यामध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून किंवा जिल्हाधिकाऱ्यास आपण होऊन पुढीलप्रमाणे कोणत्याही कारणांवरून *वाजिब-उल-अर्ज* मधील कोणत्याही नोंदीत फेरबदल करता येईल किंवा तीत नवीन नोंद दाखल करता येईल :-

(क) अशा नोंदीमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींची त्या नोंदीत फेरबदल करण्यात यावा अशी इच्छा आहे; किंवा

(ख) दिवाणी दाव्यातील हुकूमनाम्याद्वारे ती नोंद चुकीची आहे असे जाहीर करण्यात आले असेल; किंवा

(ग) ती नोंद दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर किंवा एखाद्या महसूल अधिकाऱ्याच्या आदेशावर आधारलेली असली तरी ती, त्या हुकूमनाम्याप्रमाणे किंवा आदेशाप्रमाणे नाही; किंवा

(घ) ती नोंद अशा हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर आधारलेली असली तरी त्यानंतर अपील, फेरतपासणी किंवा पुनर्विलोकन करण्यात आल्यावर असा हुकूमनामा किंवा आदेश यात नंतर फेरबदल करण्यात आलेला आहे; किंवा

(ङ) अशा गावात चालू असलेला कोणताही रिवाज दिवाणी न्यायालयाने हुकूमनाम्याद्वारे निश्चित केलेला आहे.

*मच्छिमारी इत्यादींचे नियमन*

१६६. (१) राज्य शासनाला पुढील गोष्टींचे नियमन करण्यासाठी नियम करता येतील -

(क) शासकीय तलावातील मच्छिमारी;

(ख) राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीतून कोणतीही सामग्री नेणे.

(२) परवाने देणे, अशा परवान्यांबाबत शर्ती ठरविणे आणि त्याकरिता फी लादणे व तदनुषंगिक अन्य गोष्टींची अशा नियमात तरतूद करता येईल.

*तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा*

१६७. (१) या संहितेत अन्यथा जी तरतूद केली असेल त्याखेरीज, जी कोणतीही व्यक्ती कलम १६१ ते १६६ यांच्या किंवा कलम १६६ अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य करील किंवा कोणत्याही नियमांचे किंवा *वाजिब-उल-अर्ज*मध्ये दाखल केलेल्या रिवाजांचे उल्लंघन करील किंवा त्यांचे पालन करण्यात कसूर करील किंवा *निस्तारपत्रक*मध्ये दाखल केलेल्या कोणत्याही नोंदीचा भंग करील अशी व्यक्ती, तिला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र होईल; आणि त्या व्यक्तीने उपयोगात आणले असेल असे कोणतेही उत्पन्न किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीतून त्याने नेले असेल असे कोणतेही इतर उत्पन्न सरकारजमा करण्यासाठी जिल्हाधिकारी आणखी आदेश देईल.

(२) जिल्हाधिकारी, या कलमान्वये शास्ती लादणारा आदेश देईल तेव्हा त्यास असा निर्देश देता येईल की अशा उल्लंघनामुळे, असा भंग केल्यामुळे किंवा पालन न केल्यामुळे लोकांना पोचणारी हानी किंवा इजा

यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजनांचा खर्च भागविण्यासाठी ती शास्ती किंवा तिचा कोणताही भाग वापरण्यात यावा.

## परिशिष्ट - २

## काही प्रश्नांचे स्पष्टीकरण

**१ प्रश्न** - *वनाचा निस्तारासाठी उपयोग हा वनेतर उपयोग (नॉन-फॉरेस्ट परपज) आहे काय ?*

***उत्तर*** - नाही. स्पष्टीकरण -

१.१ बघा - वननीती १९८८ कलम नं. २.१, २.२, ३.४, ३.५, ४.३, ४.२, ४.३.४.३

१.२ गडचिरोली जिल्ह्यात १९९३-९४ मध्ये झालेल्या वन-बंदोबस्तातही वनजमिनीवर निस्तार हक्क कायम करताना निस्ताराला वनेतर उपयोग मानण्यात आले नाही.

१.३ मा. तसनीम अहमद, भा.व.से. या वन अधिकाऱ्यांनी १९९४ साली लिहिलेल्या ग्रामवनासंबंधी टिपणातही वनाचा निस्तारासाठी उपयोग हा वनउपयोगच मानण्यात आला आहे.

***२ प्रश्न*** - *महाराष्ट्र राज्य भू-राजस्व संहिता १९६६ मधील व्याख्येप्रमाणे वनजमीन ही अव्याप्त भूमी (अनआक्युपाईड लॅन्ड) आहे काय ?*

***उत्तर*** - होय. स्पष्टीकरण -

२.१ भू-राजस्व संहितेमधील व्याख्येप्रमाणे शासनाची अशी सर्व जमीन, मग ती वनभूमी असो की राजस्व भूमी, जर दुसऱ्या कुणाला दिली नसेल तर ती अव्याप्त भूमी आहे.

२.२ निस्तार पत्रक तयार करताना वनभूमीवरही निस्तार अधिकारांची

तरतूद करण्यात आलेली आहे. यावरून स्पष्ट होते की या कायद्याच्या संदर्भात वनभूमीला अव्याप्त क्षेत्रच मानण्यात आले आहे.

*३ प्रश्न - महाराष्ट्र भू-राजस्व संहितेच्या कोणत्या तरतुदीनुसार जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्राप्त झाले आहेत ? व ते कोणते ?*

**उत्तर** - कलम १६१(१) प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्राप्त झाला आहे.

३.१ जिल्हाधिकाऱ्यांनी गावातील सर्व अव्याप्त भूमी व अनुषंगाने येणाऱ्या बाबींच्या व्यवस्थापनाकरता योजनेसह निस्तार पत्रक तयार करायचे आहे. त्याकरिता आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

*४ प्रश्न - निस्तार व्यवस्थापनाची सुयोग्य योजना तयार करण्याकरता उपयोगी शासकीय योजना व अन्य कायद्यातील तरतुदी कोणत्या ?*

**उत्तर** - ४.१ उपयोगी शासकीय योजना -

४.१.१ ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन : अंमलबजावणी - वन विभाग

४.१.२ ग्राम-परिसर विकास कार्यक्रम : अंमलबजावणी - सामाजिक वनीकरण विभाग

४.१.३ एकात्मिक सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास : अंमलबजावणी - मृदूसंधारण व वन विभाग

४.२ कायद्यातील तरतुदी -

४.२.१ भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २८ प्रमाणे 'ग्रामवन'ची तरतूद. स्पष्टीकरणासाठी मा. तसनीम अहमद यांचे 'ग्रामवन' वरील टिपण (१९९४) बघा.

निस्ताराचा हक्क, जगण्याचा हक्क !
करून वन-संरक्षणाचा निर्धार,
मिळवू निस्ताराचे अधिकार !

प्रकाशक : मोहन हिराबाई हिरालाल, संयोजक, 'वृक्षमित्र',
चिद्दरवार हॉस्पिटलजवळ, आर.टी.ओ. ऑफिस समोर,
रामनगर, चंद्रपूर - ४४२४०१
फोन : ०७१७२ - ५८१३४

मुद्रक : नीतिन तापस, श्याम ब्रदर्स, गणेशपेठ, नागपूर - १८

जून २००२ : प्रती ३०००